| MHAU100006532023 | नियमित दिवाणी दावा/**55/2023**<br>विजय नारायण कुलकर्णी रोजेकर वि**..** शेकू रामचंद्र शिंदे |
|---|---|

## निशाणी ३० खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे सर्वे नं.७०, आत्ताचा गट नं. ७०/२ मधील ४ एकर ३ गुंठे शेत जमीन (यानंतर सदर जमिनीला 'वाद मिळकत' असे संबोधले आहे.) वादीने हे त्रयस्थ व्यक्तींना अडथळा व हस्तांतरीत करु नये. करीता तात्पुरता प्रतिबंध करण्यासाठी तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे.

**प्रतिदाव्यातील वादीचे थोडक्यात कथन की :-**

**०२.** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी असे कथन केले की, वादमिळकत ही बाळा यादव बारगळ व सुभाष काशीनाथ बारगळ यांच्याकडून नोंदवणीकृत खरेदीखताआधारे दिनांक १८/०२/१९९१ रोजी विकत घेतली. प्रतिवादी हे दिनांक १६/०८/२०२५ रोजी वादमिळकत कसत असतांना वादी हा काही लोकांना सोबत घेवुन वादमिळकतीकडे बोट दाखवुन विक्री करायचे असल्याचे सांगू लागला. प्रतिवादींनी वादमिळकत ही त्यांनी खरेदी केली असल्याचे सांगितले असता वादीने गलीच्छ भाषेत शिवीगाळ केली व लाकडी दांड्याने मारण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत वादींविरुध्द तक्रार दिली. करीता सदरील अर्ज मान्य करण्याची विनंती केली.

**०३.** याउलट वादीने सदरील अर्जाला म्हणणे दाखल करीत अर्जातील कथने नाकारली व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. त्यामध्ये वादीने असे कथन केले की, सदरील प्रकरण हे साक्षी पुराव्यासाठी प्रलंबित असून प्रतिवादीने वादमिळकत विकत घेतल्याचे मान्य केले परंतु ४ एकर ३०-आर जमीन विकत घेतल्याचे अमान्य केले. प्रतिवादीने ३०-आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेले आहे. प्रतिवादी हे ७/१२ उता-यावरील क्षेत्राचा चुकीचा अर्थ काढून जमीन हडप करण्याचा प्रयत्न करीत आहेत. करीता सदरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०४.** प्रतिवादीतर्फे ॲड. श्री. डी.पी.साठे हे युक्तीवादाकरीता हजर नव्हते. वादी तर्फे ॲड.श्री. उबाळे यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनीय प्रकरण प्रतिवादीच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| २ | प्रतिवादीचे कधीही न भरुण येणारे नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ३ | तुलनात्मक दृष्ट्या दावा प्रतिवादीच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| ४ | काय प्रतिवादी तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत ? | नाही. |
| ५ | काय हुकूम ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता -**

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेला घेतले आहे).

०६. प्रतिवादीने असे कथन केले की, अर्जातील वादमिळकत ही बाळा यादव बारगळ व सुभाष काशीनाथ बारगळ यांच्याकडून नोंदवणीकृत खरेदीखताआधारे खरेदी केली व वादी हे त्या मिळकतीवर इतर व्यक्ती आणून ती जमीन विक्री करीता दाखवत आहेत. तरी वादीने वादमिळकत ही इतर त्रयस्थ व्यक्तींना विक्री, गहान करु नये याकरीता सदरील अर्ज मंजुर करण्याची प्रार्थना केली. याउलट वादीने अर्जातील कथने नाकारुन प्रतिवादींनी अतिक्रमण करुन अडथळा करीत असल्याचे कथन केले. वादीने अर्जातील वादमिळकत ही विकत घेतल्याचे मान्य केले परंतु त्यात नमुद केलेल्या क्षेत्राबाबत आक्षेप घेतला. वादीने सदरील दावा हा मनाई हुकूम मिळण्याकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला. याउलट प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे मांडून वादींची कथने नाकारील. परंतु प्रतिवादींनी सदर प्रकरणात प्रतिदावा दाखल केला नाही. प्रतिवादींनी प्रतिदावा दाखल न करता सदरील अर्ज दाखल केला. सदरील प्रकरण हे सध्या वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित आहे. सदरील प्रकरणामध्ये वादी व प्रतिवादींमध्ये ताबा व मालकीबाबत वाद दिसून येतो. अशा वेळेस वादी व प्रतिवादींचा पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. या कारणास्तव सदरील अर्ज मंजुर करता येणार नाही. म्हणुन मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्रमांक ४ करिता</u> -**

**०७.** मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तरावरुन प्रतिवादीने वादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमास आवश्यक असलेले घटक त्याच्या बाजुने सिध्द केल्याचे स्पष्ट होत नाही. म्हणुन प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज त्यांचे विरुध्द मंजुर होण्यास पात्र नाही. म्हणुन मुद्दा क्र. ४ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे व मुद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.03.24 15:07:22 +0530

दि. २३/०३/२०२६.

**(जी.डी. गुरनुले)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
खुलताबाद.

## CERTIFICATE

I am affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | N.D.Narwade |
| Court | : | Court no. 02, Khultabad. |
| Date of the order | : | 23/03.2026. |
| Order signed by the presiding officer on | : | 23/03.2026. |
| Order uploaded on | : | 24/03.2026. |

..........